**जिल्हा परिषद ,नांदेड अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित गट-क संवर्गातील सरळसेवेची रिक्तपदे भरण्याची जाहिरात पदभरती सन २०२१ जाहिरात क्रमांक ०१/२०२१**

# जाहिरात व जाहीर प्रकटन शुध्दीपत्रक

**संवर्गाचे नांव :-१.आरोग्य सेवक (महिला)२.आरोग्य सेवक (पुरुष)३.औषधनिर्माता४.प्रयोगशाळा तंत्रज्ञ ५.आरोग्य पर्यवेक्षक**

ग्रामविकास विभाग शासन पत्र दिनांक ०२ सप्टेंबर २०२१ अन्वये दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ रोजीच्या शुध्दीपत्रकातील दुरुस्तीस अनुसरुन जाहिर प्रकटन व जाहितातीमध्ये शुध्दीपत्रक प्रसिध्द करणे बाबत नमूद केले आहे.

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र संकीर्ण -२०२०/प्र.क्र.९९ /आस्था-८,दि.२०/०८/२०२१ **मधील विवरण पत्र "अ" मधील मुद्दा क्र ५ खालीलप्रमाणे आहे,**

"माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती.तथापी आता शासनाचे महापरीक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे.त्यामुळे उमेदवारांना एकाच जिल्हा परिषदेमधुन परीक्षा देता येईल.यासाठी ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरीता अर्ज सादर केले आहेत,अशा उमेदवारांनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरिलप्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक ०१ सप्टेंबर २०२१, ते १४ सप्टेंबर २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल. "

या ऐवजी

**"माहे मार्च,२०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदासाठी अर्ज करण्याची मुभा होती.तथापी, आता शासनाचे महापरीक्षा पोर्टल रद्य झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे.त्यामुळे उमेदवारांना एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहुन परीक्षा देता येणार आहे.तथापी ५ संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणा-या परीक्षासाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे.त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधून अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील.अशा उमेदवाराबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदेअंतर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहुन परीक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणा-या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतुन सदर पदभरतीसाठी अर्ज भरला आहे,त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरिताच्या तयार होणा-या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्यांचे नांव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भुत केले जाईल.**

**तसेच नव्याने समाविष्ट झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागांसाठी प्रसिध्द होणा-या जाहिरातीनुसार परिक्षेला बसु इच्छीणा-या उमेदवाराला दिनांक २३/०७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषंदामध्ये पदासाठी अर्ज करता येईल.तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदासाठी अर्ज करण्याची मुभा राहील.परंतु,प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारले जाईल.तसेच ,उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे.याबाबत www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.त्या प्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.तसेच,सदर उमेदवारांबाबतही परीक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहील, " असे वाचावे.तसेच शासन शुध्दीपत्रक दि.२०/०८/२०२१ सोबतच्या विवरणपत्र "अ " मधील मुद्याक्रमांक ८ - रद्द करण्यात येत आहे व विवरणपत्र "ब" मधील अ.क्र.२ मधुन "एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडून जिल्हाचा विकल्प घेणे "ही बाब वगळण्यात येत आहे.याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

| | | |
|---|---|---|
| **सचिव सचिव**<br>**जिल्हा निवड समिती तथा**<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नांदेड | **सदस्य**<br>**मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>जिल्हा परिषद, नांदेड | **अध्यक्ष**<br>**जिल्हा निवड समिती, तथा**<br>जिल्हाधिकारी, नांदेड |